# मराठी विभागाचा शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ चा अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ मध्ये मराठी विभागाच्या वतीने वेगवेगळे उपक्रम राबवण्यात आले.यामध्ये बुधवार दि.७ सप्टेंबर २०२२ रोजी पदवी प्रथम वर्षाच्या नवोदित विद्यार्थ्यांचा स्वागत व परिचय कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमाला एकूण ३२ विद्यार्थी उपस्थित होते.गुरूवार दि.८ सप्टेंबर २०२२ रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ.अशोक घोळवे यांचे अभ्यागत व्याख्यान घेण्यात आले.या उपक्रमाला ४९ विद्यार्थी उपस्थित होते. सोमवार दिनांक ७ नोंव्हेंबर २०२२ रोजी बीड येथे भरलेल्या जिल्हास्तरीय ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलनामध्ये विभागाच्या १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.गुरूवार दिनांक १७ नोंव्हेंबर २०२२ रोजी श्री.क्षेत्र पैठण येथे विभागाच्या एकदिवशीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये विभागातील एकूण १६ विद्यार्थी सहभागी झाले होते.दि.२७ व २८ डिसेंबर २०२२ (मंगळवार व बुधवार) रोजी विभागाच्या माजी विभागप्रमुख तथा महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त भव्य अशा साहित्य महोत्सवाचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात आले होते.त्यामध्ये मराठी विभागाने महत्वपूर्ण कामगिरी बजावली.दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२३ दरम्यान विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. यामध्ये प्रा.सुधीर माने यांचे बोलावे मराठीत... लिहावे मराठीत .. ! या विषयावरील व्याख्यान प्राध्यापकांचे कविसंमेलन,विद्यार्थ्यांचे काव्यवाचन,ग्रंथप्रदर्शन,~~ग्रंथप्रदर्शन,~~एकतास वाचनाचा उपक्रम आदी उपक्रम घेण्यात आले.सोमवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

विभागातील प्राध्यापक डॉ.रामनाथ वाढे यांना चालू शैक्षणिक वर्षामध्ये वासुदेव मुलाटे समीक्षा पुरस्काराने आणि यशवंतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या शैक्षणिक वर्षामध्ये विभागातील प्राध्यापक डॉ.रामनाथ वाढे यांचे ०२ तर विभाग प्रमुख डॉ.बालासाहेब कटारे यांचे ०६ शोधनिबंध वेगवेगळ्या वाङ्‌मयीन नियतकालिकातून आणि ग्रंथातून प्रकाशित झाले.

मराठी विभाग  
सौ.के.एस.के.महा.बीड  
मराठी विभागप्रमुख  
सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड

## विद्यार्थ्यांची साहित्य संमेलनास भेट व सहभाग

सोमवार, दि. ७ नोव्हेंबर २०२२ रोजी बीड येथे भरलेल्या २६ व्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनामध्ये मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. उद्घाटन कार्यक्रम, परिसंवाद सत्र, समारोप कार्यक्रम, पुस्तक प्रदर्शन, ग्रंथदिंडी आदीं उपक्रमांमध्ये विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.




२६ वे मराठी जिल्हास्तरीय ख्रिस्ती साहित्य संमेलन.

दै. दिव्यमराठी, 18/01/2023

## प्रा.डॉ.रामनाथ वाढे यांना राज्यस्तरीय यशवंतरत्न पुरस्कार जाहीर

बीड । केएसके महाविद्यालय बीड येथील मराठीचे प्रा.डॉ. रामनाथ गंगाधर वाढे यांना जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय यशवंतरत्न पुरस्कार जाहीर झाल्याचे निवड समितीच्यावतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र गाडेकर यांनी पत्रकाद्वारे कळवले आहे. प्रा. रामनाथ वाढे यांनी नवगण शिक्षण संस्थेत पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयात अनेक वर्ष प्राध्यापक म्हणून कार्य केले आहे. दरम्यान संशोधन क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. 'मराठवाड्यातील कहारांचे लोकसाहित्य' या विषयावर त्यांचा प्रबंध आहे. कहार आणि त्यांचे लोकसाहित्य, मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण एक अभ्यास हे त्यांचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.



दै. दिव्यमराठी
21/01/2023

## अवतीभवती

### प्रा. रामनाथ वाढेंना पुरस्कार जाहीर

बीड : येथील केएसके महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रा. डॉ. रामनाथ वाढे यांना जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठानचा यशवंतरत्न पुरस्कार जाहीर झाला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र गाडेकर यांनी पुरस्काराची घोषणा केली. प्रा. वाढे यांनी पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयात अनेक वर्ष प्राध्यापक म्हणून कार्य केले. दरम्यान संशोधन क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. मराठवाड्यातील कहारांचे लोकसाहित्य या विषयावर त्यांचा प्रबंध आहे. कहार आणि त्यांचे लोकसाहित्य, मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण एक अभ्यास हे त्यांचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. आगामी काळात लवकरच कहारांची गीते हे पुस्तक प्रकाशित होणार आहे. त्यांचे ३५ शोधनिबंध प्रसिद्ध आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी पीएच.डीचे संशोधन कार्य करीत आहेत. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



रामनाथ वाढे

दै. सकाळ
20/01/2023

CS Scanned with CamScanner

प्रा.डॉ.रामनाथ वाढे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन व पुरस्कार


शुक्रवार, दि. ७ ऑक्टोबर २०२२ रोजी डॉ. रामनाथ वाढे लिखित 'मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.




पुस्तक प्रकाशन समारंभ प्रसंगी सुप्रसिद्ध कवी मा. प्रभाकर साळेगावकर व इतर मान्यवर...



समीक्षा लेखनाचा वासुदेव मुलाटे पुरस्कार स्वीकारताना डॉ. वाढे समवेत मंचावरील मान्यवर




अभ्यागत व्याख्यानाला उपस्थित विद्यार्थी

CS Scanned with CamScanner

# दि. २७ फेब्रुवारी २०२३ मराठी भाषा गौरव दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२३ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी शिंदे व इतर मान्यवर.




CS Scanned with CamScanner



मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित विद्यार्थ्यांचे कविसंमेलन उपक्रमात कवितावाचन करताना विद्यार्थिनी.



विद्यार्थ्यांचे कविसंमेलन उपक्रम



भाषा पंधरवड्यानिमित्त आयोजित
'एक तास वाचनाचा' उपक्रम




एक तास वाचनाचा उपक्रम

CS Scanned with CamScanner




भाषा पंधरवड्यानिमित्त आयोजित ग्रंथप्रदर्शन



ग्रंथप्रदर्शनास प्राध्यापक व विद्यार्थी यांची भेट

CS Scanned with CamScanner



प्राध्यापक कविसंमेलनात सहभागी रसिक-श्रोते



कविसंमेलनात सहभागी विद्यार्थी

CS Scanned with CamScanner



मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित प्राध्यापक कवींचे कविसंमेलन.



कविता सादर करताना कवयित्री प्रज्ञा पेडेशमाडकर



'बोलावे मराठीत, लिहावे मराठीत..!' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. (डॉ.) सुधीर माने

# मराठी भाषा संवर्धनासाठी कृतीशिल प्रयत्नांची गरज : प्रा. माने

प्रतिनिधी | बीड

मराठी भाषेला प्रदीर्घ इतिहास आणि समृध्द परंपरा आहे. संत साहित्याने मराठी भाषा समृध्द करण्यासाठी मोठे योगदान दिलेले आहे. या प्रदीर्घ मराठी भाषिक इतिहासामध्ये अनेक भाषिक आक्रमणे पचवून आजची मराठी जिवंत आहे. परंतु जागतिकीकरणाच्या आणि यंत्रयुगाच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषा मरते आहे की काय ? अशी काहीशी साशंक परिस्थिती निर्माण झालेली दिसते.दररोज अन्य भाषेतून कितीतरी शब्दप्रयोग मराठी भाषेत येऊन मिसळत आहेत. त्यामुळे भाषिक हानी होत आहे. हे भाषिक आक्रमण थांबवून मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी समाजातून कृतीशील प्रयत्न होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मराठी भाषेचे अभ्यासक प्रा.सुधीर माने यांनी व्यक्त केले.

बीड येथील केएसके महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. 'बोलावे मराठीत, लिहावे मराठीत' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.सतीश माऊलगे,कमविचे पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमात बोलताना प्रा.डॉ. सुधीर माने.

पुढे बोलताना ते म्हणाले साधारणतः नवोदोत्तरीनंतर आपल्याकडे जागतिकीकरणाचा प्रवाह आला. या जागतिकीकरणामुळे समाजातील सर्व स्तरातील सांस्कृतिक सपाटीकरण होण्याचा धोका निर्माण झाला आहे.हे थांबवून भाषिक आणि सांस्कृतिक अस्मिता जिवंत ठेवायची असेल तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने जाणीवपूर्वक भाषिक कृती करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यामागची भूमिका विषद करून हा पंधरवडा शासनाच्या परिपत्रकानुसार घ्यावा लागतो आहे हीच मोठी शोकांतिका आहे असे अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.हा कार्यक्रम मराठी विभागामार्फत घेण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.बालासाहेब कटारे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.रामनाथ वाढे यांनी केले.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा
## दि. १४ ते २८ जानेवारी २०२३

दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२३ दरम्यान मराठी भाषा विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये मराठी भाषा संवर्धन करणारे वैविध्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले.




भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमानिमित्त 'बोलावे मराठीत, लिहावे मराठीत..!' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी आलेल्या प्रमुख अतिथी मा. सुधीर मागे यांचे स्वागत करताना उपप्राचार्य डॉ. शंकर पाटील देवळालकर.




साहित्य महोत्सवांतर्गत आयोजित व्याख्यान कार्यक्रमात प्रा. दगडूदादा लोमटे, प्रा. डॉ. विद्यासागर पाटंगणकर, श्री. सुधीर आवटे आदी.

CS Scanned with CamScanner

## प्राचार्य तथा मराठी विभागाच्या प्रमुख डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त भव्य साहित्य महोत्सव समारंभाचे आयोजन.

डिसेंबर २०२२ मध्ये प्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ. दीपा क्षीरसागर निवृत्त झाल्या. त्यांच्या सेवेचा गौरव व्हावा या हेतुने दि. २७ व २८ डिसेंबर २०२२ रोजी भव्यदिव्य अशा साहित्य महोत्सवाचे आयोजन विभागामार्फत करण्यात आले.




साहित्य महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या परिसंवाद उपक्रमात सहभागी मान्यवर. अ.भा. म. साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. भारत सासणे, शांतिवनचे संस्थापक श्री. दीपक नागरगोजे, श्री. अरुंधती पाटील, प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर

## शैक्षणिक सहलीचे आयोजन

गुरुवार, दि. १७ नोव्हेंबर २०२२ रोजी श्री.क्षेत्र पैठण येथे मराठी विभागाच्या एकदिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीमध्ये संत ज्ञानेश्वरांचे जन्मगाव आपेगाव, संत एकनाथांचे जन्मस्थळ श्रीक्षेत्र पैठण, नाथसागर, संतविद्यापीठ आदी स्थळांना विद्यार्थी भेटी दिल्या.



सहलीमध्ये सहभागी विद्यार्थी, समवेत प्राध्यापकवृंद




साहित्य संमेलनामध्ये सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक




साहित्य संमेलनामध्ये सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक